# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११ ०१८.

## मा.स्थायी समिती

**कार्यपत्रिका क्रमांक - १८**

**(सभावृत्तांत)**

दिनांक–१९/०७/२०१७ वेळ – दुपारी २.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहिक सभा बुधवार,दिनांक १९/०७/२०१७ रोजी दुपारी २.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१) मा.सावळे सिमा रविंद्र - सभापती
२) मा.उंडे लक्ष्मण धोंडू
३) मा.कुंदन अंबादास गायकवाड
४) मा.उत्तम प्रकाश केंदळे
५) मा.माधुरी कुलकर्णी उर्फ मोनाताई
६) मा.हर्षल मच्छिंद्र ढोरे
७) मा.कुटे निर्मला संजय
८) मा.कोमल दिपक मेवानी
९) मा.आशा धायगुडे-शेंडगे
१०) मा.गोफणे अनुराधा देविदास
११) मा.वैशाली जालिंदर काळभोर
१२) मा.राजू मिसाळ
१३) मा.अमित राजेंद्र गावडे
१४) मा.कैलास उर्फ बाबा भालचंद्र बारणे

याशिवाय मा.श्रावण हर्डीकर–आयुक्त, मा.अच्युत हांगे-अति.आयुक्त,मा.उल्हास जगताप-नगरसचिव,मा.तळदेकर-मुख्यलेखापरिक्षक, मा.चव्हाण-शहर अभियंता, मा.डॉ.अनिल रॉय–आरोग्य वैद्यकीय अधिकारी, मा.लांडे-मुख्यलेखापाल, मा.गावडे-सहआयुक्त,मा.तुपे,मा.दुधेकर,मा.पठाण–सहशहर अभियंता,मा.डोईफोडे,मा.कडूसकर,मा.दुरगुडे,मा.इंदलकर,मा.आष्टीकर,मा.लोणकर,मा.बोदडे,मा.खोत-सहाय्यक आयुक्त,मा.साळुंके-मुख्य उद्यान अधिक्षक,मा.पाटील-प्राचार्य,औद्योगिक प्रशिक्षण केंद्र, मा.आवारी-प्रशासन अधिकारी (शिक्षण मंडळ),मा.पोमण-मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी, मा.निकम,मा.सवणे,मा.इंगळे,मा.तांबे,मा.घुबे,मा.लडकत,मा.कुलकर्णी,मा.खाबडे,मा.बरशेट्टी, मा.जुंधारे, मा.गलबले,मा.घोडे,मा.ओंभासे,मा.गट्टूवार,मा.पुजारी,मा.गायकवाड,मा.भोसले,मा.पाटील-कार्यकारी अभियंता,मा.बहुरे-प्रशासन अधिकारी,मा.जरांडे-सुरक्षा अधिकारी, मा.लावंड-कायदा अधिकारी, मा.शिंपी-नगररचनाकार हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**<u>उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करून घेणेत आले –</u>**

विषय क्रमांक २२) ६ क्षेत्रिय कार्यालयांतर्गत साफसफाईच्या कामासाठी नेमलेल्या ठेकेदारांकडील कंत्राटी कामगारांच्या भविष्य निर्वाहनिधीची तपासणी करणेबाबत...

विषय क्रमांक २३) उद्यानाबाहेरील सार्वजनिक शौचालय रद्द करून ई-टॉयलेट बसविणेबाबत – मा.कैलास बारणे, मा.लक्ष्मण उंडे यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक २४) मनपाचे स्व.तानाजीराव शितोळे सरकार उद्यान देखभाल व संरक्षण कामाबाबत – मा.हर्षल ढोरे, मा.उत्तम केंदळे यांचा प्रस्ताव....

विषय क्रमांक २५) मनपाच्या पॅनेलवरील आर्किटेक्ट नेमणेबाबत- मा.आशा धायगुडे-शेंडगे, मा.माधुरी कुलकर्णी यांचा प्रस्ताव...

-----------

दिनांक ०५/०७/२०१७ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक १६) चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

-----------

**निर्णय–१) <u>महापालिकेच्या प्राथमिक व माध्यमिक शाळांमधील सुविधांबाबत</u>** –

अ) स्थायी समितीने दिलेले आदेश ज्या अधिका-यांना मानायचे नाहीत, त्यांनी सभागृहात बैठकीस बसू नये.

आ) मा.अतिरिक्त आयुक्त यांना स्थायी समितीचे कडक निर्देश आहेत की, सांगितलेल्या गोष्टींचे पालन व्हावे. टेंडरच्या अटी-शर्तींना धरुनच वर्कऑर्डर झाल्या पाहिजेत, असे सक्त निर्देश आहेत. त्याचे पालन करताना चुकल्यास त्यास स्थायी समितीकडून माफी दिली जाणार नाही. जर कोणत्या अटी-शर्तींमध्ये बदल करणार असालतर, या सक्षम सभागृहास त्याचे अधिकार असल्यामुळे, त्याची माहिती स्थायी समितीला देण्यात यावी. परस्पर कोणतेही निर्णय घेण्यात येऊ नयेत. त्यामुळे आपले म्हणणे सभागृहापुढे मांडावे. अटी-शर्तींसहीत टेंडर निघालेले असेलतर त्यातील अटी-शर्ती लागू झाल्या पाहीजेत.

इ) अ,ब,क,ड,इ,फ असे प्रभागनिहाय महापालिका शाळांच्या मुख्याध्यापकांना आज किंवा उद्या बैठकीस बोलवावे. शुक्रवारपर्यंत सर्व माहिती अद्ययावत ठेवावी.

२) **<u>चिखली येथे बांधलेल्या शाळेबाबत</u>** – काम वेळेत पूर्ण करावे,कामाचा दर्जा राखला जावा. त्याबाबतीत कोणतीही तडजोड विचारात घेतली जाणार नाही. सन्मा.सदस्य कुंदन गायकवाड यांनी ज्या काही सूचना केल्या आहेत, त्यावर गांभिर्याने अंमलबजावणी करण्यात यावी.

-----------

ठराव क्रमांक – ६५९ विषय क्रमांक – १
दिनांक – १९/०७/२०१७ विभाग – उद्यान
सूचक – मा.लक्ष्मण उंडे अनुमोदक – मा.कुंदन गायकवाड
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.उद्यान/६/कावि/५९०/२०१७ दि.१/७/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाचे उद्यान विभागाकडील निविदा नोटीस क्र.१०/२/२०१६-१७ अन्वये ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले उद्यान देखभाल संरक्षण करणेकामी मे.तावरे कंन्स्ट्रक्शन कंपनी या ठेकेदाराची निविदा अंदाजपत्रकिय दरापेक्षा ३१.५९% कमी स्विकृत करणेत आली असुन प्रस्तुतकामी येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**निर्णय-** सन्मा.नगरसेविका अनुराधा गोफणे यांनी त्यांचे प्रभागातील सखुबाई गवळी उद्यानाबाबत ज्या सूचना केल्या आहेत, मा.मुख्य उद्यान अधिक्षक यांनी त्यावर कार्यवाही करावी आणि त्याची छायाचित्रे सन्मा.नगरसेविका यांना व्हॉटस् अपवर पाठवावीत

----------

ठराव क्रमांक – ६६० विषय क्रमांक – २
दिनांक – १९/०७/२०१७ विभाग – लेखा
सूचक – मा.उत्तम केंदळे अनुमोदक – मा.माधुरी कुलकर्णी
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.लेखा/१/कावि/१६४४/२०१७ दि.३/७/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मुंबई प्रांतिक महापालिका अधिनियम १९४९ चे कलम ९४ नुसार महानगरपालिकेचे सन २०१५-१६ या वर्षातील प्रत्यक्ष जमा खर्चाचे वार्षिक लेखे तयार करण्यात आले आहेत. सदर वार्षिक लेख्यांनुसार प्रत्यक्ष जमा खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ६६१ विषय क्रमांक – ३
दिनांक – १९/०७/२०१७ विभाग – क्रीडा प्रबोधिनी विद्यालय
सूचक – मा.निर्मला कुटे अनुमोदक – मा.हर्षल ढोरे
संदर्भ:- मा.अति.आयुक्त यांचे जावक क्र.क्रीप्रबो/१/कावि/४१८/२०१७ दि.७/७/२०१७

मा.अति.आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या क्रीडा प्रबोधिनी विद्यालयातील लेखापरीक्षण डी.ओ.सी. क्रं.१९६३ आक्षेप क्रं.अ-०१ मधील श्रीम.जी.एच.जरांडे यांचे नेमणुकीस व त्यांना देय असणारा दैनिक/ प्रवास भत्यास मा.स्थायी समिती सभेची कार्योत्तर मान्यता घेणे आवश्यक आहे. त्यानुसार प्रस्तावात नमुद प्रमाणे त्यांना अदा केलेल्या दैनिक व प्रवास भत्यांस रक्कम रू.२४,४९३/- (अक्षरी र.रू.चोवीस हजार चारशे त्र्यान्नव फक्त) सदरच्या रक्कमेस कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक – ६६२ विषय क्रमांक – ४
दिनांक – १९/०७/२०१७ विभाग – स्थापत्य उद्यान
सूचक – मा.आशा धायगुडे-शेंडगे अनुमोदक – मा.कोमल मेवानी
संदर्भ:- मा.अति.आयुक्त यांचे जावक क्र.स्था/उद्यान/४९/२०१७ दि.१०/७/२०१७

मा.अति.आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य उद्यान विभागाकडील प्रस्तावा सोबतच्या प्रपत्र अ (क्र.१ते८) मधील निविदा कामांचे अवलोकन होवून नियमानुसार व निविदा अटी शर्ती प्रमाणे तसेच भाववाढ कलमानुसार भाववाढ देय असल्यास मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसूल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करुन कामाचे आदेश निर्गत केले असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ६६३ विषय क्रमांक – ५
दिनांक – १९/०७/२०१७ विभाग – स्थापत्य उद्यान
सूचक – मा.अनुराधा गोफणे अनुमोदक – मा.वैशाली काळभोर
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था.उ/कावि/३७५/२०१७ दि.७/७/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपळे निलख येथील आ.क्र.३७४ येथील उद्यान विकसित करण्यासाठी सर्व्हेक्षण करणे, आराखडे तयार करणे व अंदाजपत्रक तयार करणे इ कामे करण्यासाठी मे.शिल्पी आर्कीटेक & प्लॅनर्स यांची वास्तु विशारद म्हणून नेमणूक करण्यास व म.न.पाच्या आर्किटेक्ट पॅनलच्या फि-स्ट्रक्चर मुळ मंजूर मा.स्थायी समिती ठराव क्र.११२६२ दि.०५/१०/२००५ (Annexure-1) नुसार इंडियन कौन्सील ऑफ आर्किटेकचे नियमानुसार फी अदा करण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ६६४ विषय क्रमांक – ६
दिनांक – १९/०७/२०१७ विभाग – स्थापत्य अ मुख्यालय
सूचक – मा.राजू मिसाळ अनुमोदक – मा.अमित गावडे
संदर्भ:- मा.शहर अभियंता यांचे जावक क्र.स्था/नि/अ-मुख्य/५०३/१७ दि.१०/७/२०१७

मा.शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.६७/१/२०१६-१७ प्रभाग क्र.१९ रावेत येथील स.नं.७२,७३,७६ व ७७ मधील विकास आराखड्यातील १८ मी. रुंदीचे रस्ते व इतर ठिकाणचे रस्ते विकसित करणेकामी M/s.ANANT BALKRUSHNA BAHIRAT नि.र.रु.२३,३४,२६७/- (अक्षरी र.रू. तेवीस लाख चौतीस हजार दोनशे सदुसष्ठ फक्त) पेक्षा १५.५१% कमी या ठेकेदाराकडुन निविदा मंजुर दराने र.रु.२०,७०,८३३/- पर्यंत काम करून घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारीत केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम

अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहुन त्यांचेबरोबर करारनामा करुन आदेश निर्गत केले असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ६६५ | विषय क्रमांक – ७

दिनांक – १९/०७/२०१७ | विभाग – स्थापत्य अ मुख्यालय

सूचक – मा.कैलास बारणे | अनुमोदक – मा.लक्ष्मण उंडे

संदर्भ:- मा.शहर अभियंता यांचे जावक क्र.स्था/नि/अ-मुख्य/५०२/१७ दि.१०/७/२०१७

मा.शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.६७/७/२०१६-१७ प्रभाग क्र.१९ रावेत येथील स.नं.१३२ ते १०२ मधील विकास आराखड्यातील १८ मी.रुंदीचा रस्ता व इतर ठिकाणचे रस्ते विकसित करणेकामी M/s.BAHIRAT BROTHERS नि.र.रु.२३,३४,२६६/-(अक्षरी र.रू.तेवीस लाख चौतीस हजार दोनशे सहासष्ठ फक्त) पेक्षा २६.१०% कमी या ठेकेदाराकडुन निविदा मंजुर दराने र.रु.१८,११,२७४/- पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारीत केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहुन त्यांचेबरोबर करारनामा करुन आदेश निर्गत केले असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ६६६ | विषय क्रमांक – ८

दिनांक – १९/०७/२०१७ | विभाग – स्थापत्य अ मुख्यालय

सूचक – मा.लक्ष्मण उंडे | अनुमोदक – मा.कुंदन गायकवाड

संदर्भ:- मा.शहर अभियंता यांचे जावक क्र.स्था/नि/अ-मुख्य/५०१/१७ दि.१०/७/२०१७

मा.शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.६७/९/२०१६-१७ प्रभाग क्र.१९ रावेत येथील स.नं.१३९ ते १०५ पर्यंतचा विकास आराखड्यातील १८ मी.रुंदीचा रस्ता व इतर ठिकाणचे रस्ते विकसित करणेकामी M/s.ANANT BALKRUSHNA BAHIRAT नि.र.रु.२३,३४,२६५/-(अक्षरी र.रू.तेवीस लाख चौतीस हजार दोनशे पासष्ठ फक्त) पेक्षा २६.१०% कमी या ठेकेदाराकडुन निविदा मंजुर दराने र.रु.१८,११,२७३/- पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारीत केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहुन त्यांचेबरोबर करारनामा करुन आदेश निर्गत केले असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ६६७ विषय क्रमांक – ९
दिनांक – १९/०७/२०१७ विभाग – पाणीपुरवठा
सूचक – मा.उत्तम केंदळे अनुमोदक – मा.माधुरी कुलकर्णी

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.पापु/६/कावि/३६६/२०१७ दि.४/७/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या पाणीपुरवठा विभागाच्या नि.क्र.१७/७/२०१६-१७ अन्वये सेक्टर क्र.२३ निगडी येथील जलशुद्धीकरण केंद्रातील टप्पा क्र.३ च्या फिल्टर बेड्स साठी छताची उभारणी करणे व तदनुषंगिक कामे करणेकामी मे.शुभम उद्योग निविदा रक्कम रू.३७,५७,७८५/- (अक्षरी र.रू.सदोतीस लाख सत्तावन्न हजार सातशे पंच्याऐंशी फक्त) पेक्षा १०.००% कमी दराने या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रु.३५,५१,१०६/- पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार व निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरीयलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्याच्याबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ६६८ विषय क्रमांक – १०
दिनांक – १९/०७/२०१७ विभाग – पाणीपुरवठा
सूचक – मा.निर्मला कुटे अनुमोदक – मा.हर्षल ढोरे

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.पापु/६/कावि/३६९/२०१७ दि.७/७/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या पाणीपुरवठा विभागाच्या नि.क्र.१७/३/२०१६-१७ अन्वये सेक्टर क्र.२३ निगडी येथील जलशुद्धीकरण केंद्रातील टप्पा क्र.१,२,३ व ४ ची किरकोळ देखभाल दुरुस्तीची कामे करणेकामी मे. युनिक ट्रेडर्स निविदा रक्कम रू.७०,२५,४१०/- (अक्षरी र.रू.सत्तर लाख पंचवीस हजार चारशे दहा फक्त) पेक्षा १७.९६% कमी दराने या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रु.६०,५१,८२८/-पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार व निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरीयलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्याच्याबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ६६९ विषय क्रमांक – ११
दिनांक – १९/०७/२०१७ विभाग – जलनि:सारण
सूचक – मा.आशा धायगुडे-शेंडगे अनुमोदक – मा.कोमल मेवानी
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.जनि/२/कावि/१९९/१७ दि.७/७/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या जलनि:सारण विभागाकडील नि.नो.क्र.4/106/2016-17 अन्वये वॉर्ड क्र. ४७ काळेवाडी ज्योतिबा नगर परिसर येथील जलनिःसारण नलिकांची सुधारणा कामे करणेकामी M/s.P.V.Deshmukh नि.र.रू.२९,९९,९९७/- (अक्षरी र.रु.एकोणतीस लाख, नव्याण्णव हजार, नऊशे सत्याण्णव फक्त) पेक्षा 10.03% कमी या ठेकेदाराकडुन निविदा मंजूर दराने र.रू.२८,३४,०५२/- पर्यंत काम करून घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहुन त्यांचेबरोबर करारनामा करून घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ६७० विषय क्रमांक – १२
दिनांक – १९/०७/२०१७ विभाग – विद्युत मुख्य कार्यालय
सूचक – मा.अनुराधा गोफणे अनुमोदक – मा.वैशाली काळभोर
संदर्भ:- मा.सहशहर अभियंता यांचे जावक क्र.विमुका/४/कावि/२५५/२०१७ दि.११/७/२०१७

मा.सहशहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या विद्युत मुख्य कार्यालयाकडील निविदा नो. क्र.२२/२०१६-१७ मधील अ.क्र.३ अन्वये मनपा मुख्य प्रशासकीय इमारतीमधील दुरध्वनी, फॅक्स, एफ.सी.टी. राऊटर यंत्रणेचे कामकाज करणेकामी मे.पार्सन टेक्नोलॉजिस नि.र.रू.६,९३,९९८/- (अक्षरी र.रू.सहा लाख त्र्यान्नव हजार नऊशे अठ्ठ्यान्नव फक्त) दर ५.५०% कमी या ठेकेदारा बरोबर करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ६७१ विषय क्रमांक – १३
दिनांक – १९/०७/२०१७ विभाग – पाणीपुरवठा
सूचक – मा.राजू मिसाळ अनुमोदक – मा.अमित गावडे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.पापु/६/कावि/३८३/२०१७ दि.१२/७/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या पाणीपुरवठा विभागाच्या नि.क्र.१२/१३/२०१६-१७ अन्वये जलक्षेत्र क्र.ड/१५ अंतर्गत पिंपरी वाघेरे परीसरातील वितरण व्यवस्थेअंतर्गत गुरुत्व वाहिनीवरील थेट पाणीपुरवठा बंद करून उंच टाकीमार्फत पाणीपुरवठा करणेकामी देवधर हॉ. समोरील कै.अनुसयाबाई वाघेरे प्रा. शाळेच्या परीसरात नवीन उंच टाकी बांधणेकामी मे. मंगलदास इन्फ्राटेक प्रा. लि. निविदा रक्कम रू.१,४५,०४,४१३/- (अक्षरी र.रू.एक कोटी पंचेचाळीस लाख चार हजार चारशे तेरा फक्त)

पेक्षा २१.००% जादा दराने (निविदा स्विकृती योग्य दरापेक्षा २.२७% ने कमी) या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रु.१,७५,५०,३४०/- पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार व निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरीयलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्याच्याबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ६७२ | विषय क्रमांक – १४

दिनांक – १९/०७/२०१७ | विभाग – विद्युत मुख्य कार्यालय

सूचक – मा.कैलास बारणे | अनुमोदक – मा.लक्ष्मण उंडे

संदर्भः- मा.विकास अभियंता यांचे जावक क्र.विमुका/५/कावि/१५६/२०१७ दि.१०/७/२०१७

मा.विकास अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या विद्युत मुख्य कार्यालयाकडील नि.नो.क्र.24-2016/17 मधील अ.क्र.04 अन्वये सन 2016-17 करीता क क्षेत्रिय कार्यक्षेत्रातील उद्यानांतील विविध प्रकारचे बोअरवेल व इतर पंपाचे देखभाल दुरूस्ती करणे कामी मे.स्वरूप इले.इंजि. नि.र.रू.९,९६,६३९/- (अक्षरी र.रू. नऊ लाख शहान्नो हजार सहाशे एकोणचाळीस फक्त) पेक्षा २०.७०% कमी या ठेकेदाराबरोबर करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ६७३ | विषय क्रमांक – १५

दिनांक – १९/०७/२०१७ | विभाग-ब क्षेत्रीय कार्यालय स्थापत्य

सूचक – मा.लक्ष्मण उंडे | अनुमोदक – मा.कुंदन गायकवाड

संदर्भः- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.बक्षे/स्था/काविज/१२/२१७/२०१७ दि.७/७/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

जुन्या तालेरा हॉस्पीटलची इमारत पाडुन नविन इमारत बांधणे या प्रकल्पासाठी मे.शशी प्रभू अँण्ड असोसिएटस यांची सदर कामाचा पूर्व अनुभव लक्षात घेता वास्तुविशारद सल्लागार (Architect) व प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (P.M.C.) म्हणुन नेमणुक करणेस व प्रकल्प तांत्रीक दृष्ट्या व यशस्वीपणे पुर्ण होणेकामी त्यांना याकरीता मनपाचे प्रचलित दरानुसार निविदापुर्ण कामासाठी लघुत्तम नविदा दराच्या २.००% व निविदा पश्चात कामासाठी लघुत्तम निविदा दराचे १.३५%(सर्व करांसहीत) फी अदायगी करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**निर्णय-** १) पूल, प्रकल्प करताना ते किती वर्ष टिकेल, याची वॉरंटी, गॅरंटी किती वर्षे आहे, ते किती वर्षे टिकणार आहे याचा उल्लेख हा टेंडरमध्येच असावा. महापालिकेकडून केले जाणारे हे काम दर्जेदारच असले पाहिजे. याकडे प्रशासनाने लक्ष देणे गरजेचे आहे.

२) जुने तालेरा हॉस्पीटलशेजारी नव्याने उभारलेले सावित्रीबाई फुले रुग्णालय ज्या ठेकेदाराने बांधले आहे, त्याला ५३ लाख इतकी एस्कलेशन कॉस्ट दिली आहे. त्या ठेकेदाराला दंड का लावला नाही. कामाची मुदत १८ महिने असताना प्रत्यक्ष कामाला ७/८ वर्षे लागली आहेत. काम अर्धवट असताना हे हॉस्पिटल दोन वर्षांपूर्वी महापालिकेकडे हस्तांतरीत केले गेले आहे. संपूर्ण रुग्णालयात गळती होते आहे. गळतीमुळे तिथे लिफ्ट दोन वेळा जळाली आहे. लिफ्ट बंद ठेवावी लागली आहे. अत्यंत नित्कृष्ट दर्जाचे साहित्य वापरून तिथे बांधकाम केले गेले आहे. ज्याने बांधकाम केले व ज्याने देखरेख केली ही सगळीच माणसे यास सरसकट जबाबदार आहेत. तिथे लेबर रुम, ओ.टी.रुम बांधलेली नाही. रुग्णालय असल्यामुळे या बेसिक गोष्टींकडे काळजीपूर्वक लक्ष देणे गरजेचे होते. प्रशासनाने या रुग्णालयाबाबतीतली सर्व प्रकारची तांत्रिक चौकशी सखोलपणे करावी आणि एक महिना कालावधीमध्ये स्ट्रक्चरल ऑडिटसह तपशीलवार अहवाल स्थायी समितीपुढे सादर करावा.

----------

ठराव क्रमांक – ६७४ | विषय क्रमांक – १६

दिनांक – १९/०७/२०१७ | विभाग–ब क्षेत्रीय कार्यालय स्थापत्य

सूचक – मा.उत्तम केंदळे | अनुमोदक – मा.माधुरी कुलकर्णी

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.बक्षे/स्था/काविज/१२/२१६/२०१७ दि.७/७/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

चिंचवड आरक्षण क्रमांक २२९ मध्ये अद्ययावत स्मशानभुमी विकसीत करणेच्या प्रकल्पासाठी मे.शिल्पी आर्किटेक्ट्स यांची प्रकल्प सल्लागार म्हणुन नेमणुक करणेस व प्रकल्प तांत्रीक दृष्ट्या व यशस्वीपणे पुर्ण होणेकामी त्यांना या करीता मनपाचे प्रचलित दरानुसार निविदापुर्ण कामासाठी लघुत्तम नविदा दराच्या २.००% फी (सर्व करांसहीत) अदायगी करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –६७५ | विषय क्रमांक – १७

दिनांक – १९/०७/२०१७ | विभाग – उद्यान

सूचक – मा.निर्मला कुटे | अनुमोदक – मा.हर्षल ढोरे

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.उद्यान/६/कावि/६१६/२०१७ दि.७/७/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाचे उद्यान विभागाकडील निविदा नोटीस क्र.१०/३/२०१६-१७ अन्वये भोसरी सहल केंद्र उद्यान देखभाल संरक्षण करणेकामी मे.तावरे कंन्स्ट्रक्शन कंपनी या ठेकेदाराची निविदा अंदाजपत्रकिय दराने निविदा रक्कम रुपये १,०७,१८,२५६/- (अक्षरी र.रू.एक कोटी सात लाख अठरा हजार दोनशे छपन्न फक्त) स्विकृत करणेत आली असुन प्रस्तुतकामी येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**निर्णय**- १) महापालिकेतील उद्यानांच्या देखभालीकरीता स्थापत्य विभाग स्वतंत्रपणे काम करतो आहे. त्याचप्रमाणे महापालिकेची रुग्णालये,इस्पीतळे,ओ.पी.डी. यांची संख्या बरीच असल्यामुळे तसेच महापालिकेच्या प्राथमिक/माध्यमिक शाळा यांच्या देखभाल दुरुस्ती करणेकरिता स्थापत्य विभागाकडून वेगळा व स्वतंत्र कर्मचारी वर्ग नियुक्त करण्यात यावा. याकरिताच काम करेल अशी एक टिम प्रशासनाने तयार करुन द्यावी.

२) एमआयडीसी भागातील सर्व खड्डे बुजवावेत. काळेवाडीतील सबवे, बिगबाजार समोरील सबवे, फुगेवाडी मेगामार्ट समोरील सबवे हे तीनही अंडरपास/सबवे लोकांना येण्याजाण्यासाठी केले आहेत. तेथे खूप घाण आहे, लाईटचे दिवे काढले आहेत. तिथे मा.शहर अभियंता यांनी जातीने लक्ष घालून हे सब-वे लोकांना येण्याजाण्या योग्य करावेत. भिंतींची रंगरंगोटी करुन घ्यावी. शहरात काही ठिकाणी रस्त्यावरील दिवे झाडांमध्ये लपल्यामुळे रस्त्यावर पुरेसा उजेड पडत नाही, अशा ठिकाणी त्या झाडांची छाटणी करण्यात यावी.

----------

ठराव क्रमांक – ६७६ विषय क्रमांक – १८
दिनांक – १९/०७/२०१७ विभाग-यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय
सूचक – मा.आशा धायगुडे-शेंडगे अनुमोदक – मा.कोमल मेवानी

संदर्भ:- मा.वैद्यकीय अधिक्षक यांचे जावक क्र.YCMH/भांडार/२/कावि/२८९/२०१७ दि.१२/७/२०१७

मा.वैद्यकीय अधिक्षक यांनी शिफारस केलेप्रमाणे –

यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयाच्या PW/NICU विभागाने मागणी केलेनुसार त्यांचे विभागातील झील कंपनीचे वॉर्मर व फोटोथेरेपी मशीनची दुरुस्ती तातडीने करणेकामी बायोमेॅडीकल इंजिनियर यांनी मागणी केलेले साहित्य खरेदी करणेकामी झील कंपनीचे अधिकृत वितरक मे.कोठारी मेडीकल, पिंपरी यांनी सादर केलेले दरपत्रक स्विकृत करणेत आलेले आहे. त्यानुसार झील कंपनीचे वॉर्मर व फोटोथेरेपी मशीनची दुरुस्ती तातडीने होणेकामी आवश्यक पार्टस झील कंपनीचे अधिकृत वितरक मे.कोठारी मेडीकल, पिंपरी यांचे कडून निविदा न मागवता, करारनामा न करता, थेट पध्दतीने खरेदी करणेकामी त्यांना एकूण र.रु.३,३०,५९०/- (अक्षरी र.रू.तीन लाख तीस हजार पाचशे नव्वद फक्त) (सर्व करांसहित) चा पुरवठा आदेश निर्गत करणेत आलेला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ६७७ विषय क्रमांक – १९
दिनांक – १९/०७/२०१७ विभाग – मध्यवर्ती भांडार
सूचक – मा.अनुराधा गोफणे अनुमोदक – मा.वैशाली काळभोर

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.मभां/७/कावि/५१३/२०१७ दि.११/७/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपा सार्वत्रिक निव्रडणुक २०१७ चे निवडणुक कामकाजा करीता नेमणुक केलेल्या विविध कक्ष प्रमुख व निवडणुक निर्णय अधिकारी, मा.आयुक्त सो व मा.सहा आयुक्त निवडणुक यांनी वेळोवेळी आवश्यकते नुसार दिलेल्या सुचनेप्रमाणे निवडणुक कामकाजाकरीता नेमणुक केलेल्या उपस्थीत सर्व सबंधीत अधिकारी व कर्मचारी, पोलीस अधिकारी कर्मचारी, राज्य

राखीव पोलीस दल, होमगार्ड, अग्निशमक दल, वैद्यकीय पथक, आरोग्य, सुरक्षा, पाणीपुरवठा विद्युत, उद्यान विभागाचे कर्मचारी, कार व बस चालक इ. स्टाफ कर्मचारी यांना आवश्यकते नुसार चहा, नाष्टा, मर्यादित व अमर्यादीत जेवन पुरविणेकामी देण्यात आलेल्या वाढीव पुरवठा आदेश व उपरोक्त वस्तुस्थितीनुसार एकूण र.र.२२,०६,२०४/- इतका वाढीव खर्च आलेला आहे. तरी महापालिका अधिनियमाचे कलम ६७ (३) नुसार सदरचे प्रत्यक्ष झालेल्या वाढीव र.रू.२२,०६,२०४/- (अक्षरी र.रू.बावीस लाख सहा हजार दोनशे चार फक्त) चे खर्चास कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ६७८ विषय क्रमांक – २०

दिनांक – १९/०७/२०१७ विभाग – माहिती तंत्रज्ञान

सूचक – मा.राजू मिसाळ अनुमोदक – मा.अमित गावडे

संदर्भ:- मा.मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी यांचे जावक क्र.मा.तं.वि/९/कावि/३२३/२०१७ दि.१४/७/२०१७

मा.मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सर्व प्रकारच्या निविदा ऑनलाईन पध्दतीने स्विकारणेत येतात. त्याकरीता ई-निविदा प्रणाली कार्यान्वीत करणेत आलेली आहे. या प्रणालीमध्ये निविदाकाराकडून बयाणा रक्कम स्विकारणेचे सुविधा तयार करणेत आलेली आहे. या प्रणालीमध्ये प्राप्त रक्कमेचा परतावा परत करणेची ऑनलाईन सुविधा तसेच PSD चे Auto Calculation (based on rates quoted by Vendor) ची सुविधा कोटेशन नोटीस अन्वये प्राप्त लघुत्तम दरपत्रक धारक मे. प्रोबिटी सॉफ्ट प्रा. लि. यांचे कडून करारनामा न करता कामकाज करुन घेणेकामी येणा-या रक्कम रुपये १,९६,०००/- (अक्षरी र.रु.एक लाख शहाण्णव हजार फक्त) चे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ६७९ विषय क्रमांक – २१

दिनांक – १९/०७/२०१७ विभाग – माहिती तंत्रज्ञान

सूचक – मा.कैलास बारणे अनुमोदक – मा.लक्ष्मण उंडे

संदर्भ:- मा.अति.आयुक्त यांचे जावक क्र.मा.तं.वि/९/कावि/३२२/२०१७ दि.१४/०७/२०१७

मा.अति.आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विविध विभागामार्फत ऑनलाईन सिस्टीमद्वारे होणा-या कामकाजाची इत्यंभूत माहीती मनपा हद्दीतील नागरीकांना मनपा कार्यालयात न येता त्यांचे मोबाईलवर देता येणेसाठी निविदा सुचना क्रमांक १८/२०१६-२०१७ मधील लघुत्तम निविदाकार मे.टेक ९ सर्व्हीसेस, चिंचवड यांचे कडुन १ कोटी एस.एम.एस पॅक खरेदीकामी येणा-या रक्कम रुपये १६,२०,०००/- (अक्षरी र.रु.सोळा लाख वीस हजार फक्त) चे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

**<u>यानंतर सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेले ऐनवेळचे विषय घेणेत आले -</u>**

ठराव क्रमांक –६८० विषय क्रमांक – २२
दिनांक – १९/०७/२०१७ विभाग – कामगार कल्याण
सूचक – मा.लक्ष्मण उंडे अनुमोदक – मा.कुंदन गायकवाड
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.काक/३/कावि/२१९/२०१७ दि.१८/०७/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

सर्व ६ क्षेत्रिय कार्यालयांमध्ये कार्यरत असलेल्या एकुण ६८ साफसफाई ठेकेदारांकडील कंत्राटी कामगारांच्या नावांनिशी तपासणी करुन त्वरित अहवाल सादर करण्यासाठी त्रिमुर्ती कन्सल्टंसी, वाल्हेकरवाडी, चिंचवड, पुणे यांची करारनामा न करता थेट पद्धतीने नेमणुक करण्यास तसेच त्रिमुर्ती कन्सल्टंसी,वाल्हेकरवाडी,चिंचवड,पुणे यांनी मागणी केलेले तपासणी शुल्क रक्कम रुपये १,५०,०००/- (अक्षरी रक्कम रुपये एक लाख पन्नास हजार फक्त) हे कामगार कल्याण विभागाकडील “सांस्कृतीक कार्यक्रम” या लेखाशिर्षातून अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –६८१ विषय क्रमांक – २३
दिनांक – १९/०७/२०१७
सूचक – मा.कैलास बारणे अनुमोदक – मा.लक्ष्मण उंडे
संदर्भ:- मा.कैलास बारणे, मा.लक्ष्मण उंडे यांचा प्रस्ताव...

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने भोसरी, प्रभाग क्र.५ मधील कै.सखुबाई गबाजी गवळी उद्यानाच्या बाहेर सार्वजनिक शौचालयाचे काम चालू आहे. या शौचालयामुळे या परिसरात दूर्गंधी पसरून घाणीचे साम्राज्य होऊ शकते म्हणून त्यास स्थानिक नागरीकांचा विरोध आहे. तरी या ठिकाणचे सार्वजनिक शौचालय रद्द करुन तेथे ई-टॉयलेट बसविण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**निर्णय** – आळंदी मुख्य रस्त्यावर ई-टॉयलेट बसवावेत.

----------

ठराव क्रमांक –६८२ विषय क्रमांक – २४
दिनांक – १९/०७/२०१७
सूचक – मा.हर्षल ढोरे अनुमोदक – मा.उत्तम केंदळे
संदर्भ:- मा.हर्षल ढोरे, मा.उत्तम केंदळे यांचा प्रस्ताव....

मनपाचे स्व.तानाजीराव शितोळे सरकार उद्यान, सांगवी या उद्यान देखभाल व संरक्षण कामाची सध्याची मुदत संपलेली आहे. सदर कामाची निविदा यापुर्वीच दोन वेळा प्रस्तावीत केलेली असताना प्रतिसाद मिळत नसलेने पुढील कालावधीसाठी उद्यान देखभाल व संरक्षणाचे कामकाज सांगवी येथील स्थानिक संस्था मे.ईश्वरी इंटरप्रायजेस यांना र.रु.९७,०३९/- प्रति महा या दराने २ वर्षे कालावधीसाठी देणेस व त्यासाठी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

**निर्णय** – सदर विषयास निविदा प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत मान्यता देणेत येत आहे.

----------

ठराव क्रमांक –६८३ विषय क्रमांक – २५

दिनांक – १९/०७/२०१७

सूचक – मा.आशा धायगुडे-शेंडगे अनुमोदक – मा.माधुरी कुलकर्णी

संदर्भः- मा.आशा धायगुडे-शेंडगे, मा.माधुरी कुलकर्णी यांचा प्रस्ताव....

श्री.साळवे अजित हे मनपाच्या आर्किटेक्ट पॅनेलवर आहेत. त्यांनी अभियांत्रिकी स्टोअर विकसीत करणे, खेळाचे मैदान व शाळा विकसित करणेच्या नियोजन कामास सहमती दर्शविली आहे. तरी, श्री.अजित साळवे यांची मनपाच्या आर्किटेक्ट पॅनेलवर नेमणूक करण्यास व त्यांना आर्किटेक्ट विषयी कामे व इंटिरीयर डिझायनिंगची कामे देण्यास व त्याकामी होणारी फी आर्किटेक्ट कौन्सिलचे नियमानुसार व मनपा ठरवेल त्याप्रमाणे अदा करणेस व त्याकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**(सिमा रविंद्र सावळे)**
**सभापती**
स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८ नगरसचिव विभाग,
क्रमांक - नस/१०/कावि/५७/२०१७
दिनांक - २९/०७/२०१७

**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

प्रत - सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.